# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरारयांचेकार्यालय

रामनगरसुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्रमांक - ११२/२०२५ दिनांक ०६/०३/२०२५

## प्रेसनोट

### ट्रान्सफॉर्मर चोरीच्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीला उत्तरप्रदेश येथुन जेरबंद करुन ५ गुन्हयांची उकल करीत लाखोंचा मुद्देमाल हस्तगत करण्यात गुन्हे शाखा- कक्ष २, वसई यांना यश.

नायगाव पोलीस ठाणे गुन्हा रजि नं I ५६/२०२५ भा.न्या.संहीता कायदा कलम ३०३(२)प्रमाणे या गुन्हयातील फिर्यादी अजय रामा चौधरी वय ३२ रा. रुम नं ०६, बिल्डींग नं ०३, एम एस ई बी कॉलनी, वसई पुर्व, त. वसई यांनी दिनांक ११/०२/२०२५ रोजी ०६.०० वाता ते दिनांक १२/०२/२०२५ रोजी ०३.००वाजण्याच्या दरम्यान जाधववाडी, कोल्ही, चिंचोटी कामण, नायगाव पुर्व येथील महाराष्ट्र राज्य विदयुत वितरणाचे ट्रान्सफॉर्मर मधील ९०,०००/- रुपये किंमतीचे ऑईल व कॉपर कोणीतरी अज्ञात चोरटयाने लबाडीने चोरुन नेलेबाबत १२/०२/२०२५ रोजी १७.३७ वाजता सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नमुद दाखल अपराध प्रकरणाचा गुन्हे शाखा कक्ष -२ वसई करवी समांतर अन्वेषण करण्यात आले होते. प्रस्तुत अपराध प्रकरणाचे अन्वेषणा दरम्यान घनास्थळाचे आगमन-निर्गमन स्थळावरील वेगवेगळया सी.सी.टी.व्ही. चलचित्रीकरणाचे पडताळणी, भ्रमणध्वनींचे तांत्रीक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांनी दिलेल्या माहीतीच्या आधारे सदर गुन्हयाची यशस्वी उकल करण्यात यश आलेले आहे. उपरोक्त अपराध प्रकरणाचे अन्वेषणात आरोपीत नामे १) ओबेदुल्ला आलम तजम्मुल हुसेन खान वय २६ वर्ष रा. खारबाव, ता. भिवंडी, जि. ठाणे मुळ गाव- राजेडीहा बाजार, पोस्ट- खजूरी ता. खलीलीबाद, जिल्हा- संत कबीरनगर राज्य उत्तरप्रदेश २) अनिल अंबिका यादव वय २२ वर्ष रा. पायेगाव,खारबाव, ता- भिवंडी, जि- ठाणे मुळ रा. ग्राम- दुर्जनपुर, पोस्ट – पटनी जंगल, जिल्हा- सिध्दार्थनगर, राज्य उत्तरप्रदेश यांना त्यांचे मुळगाव जिल्हा- सिध्दार्थनगर, राज्य- उत्तरप्रदेश येथून दिनांक २३/०२/२०२५ रोजी ताब्यात घेवून अटक करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे उक्त उभय अटक आरोपीतांनी पोलीस अभिरक्षा कालावधील दिलेल्या माहीतीच्या आधारे गुन्हयातील सक्रिय सहभागी आरोपीत ३) जयसिंग किशोरलाल चव्हाण, वय ३६ वर्ष धंदा- रीक्षा चालक, रा. गणेश नगर चाळ, रुम -५, सुखापुर नवीन पनवेल, यास मुंबई परीसरातून ताब्यात घेवून अटक करण्यात आली आहे.

सदर अपराध प्रकरणाचे अन्वेषणात मुळ अपराध नायगाव पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक ५६/२०२५ भारतीय न्याय संहीता कायदा २०२३ चे कलम ३०३(२), ३(५) अन्वयेच्या व्यतिरीक्त आणखी ४ विदयुत रोहीत्र(ट्रान्सफॉर्मर) चोरीचे व त्यातील ऑईलचे गुन्हयांची यशस्वी उकल करुन ६२० किलोग्रॅम वजनाचे कॉपर व २० लीटर ऑईल आणि गुन्हा करण्याकरीता वापरलेली वेरना कार असा एकुण ६ लाख ५२ हजार ८०० रुपये किंमतीचा मुद्देमाल यशस्वीरीत्या जप्त करण्यात गुन्हे शाखा कक्ष -२ वसई कार्यालयास यश आले आहे. नमुद उकल करण्यात आलेल्या अपराध प्रकरणांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं व कलम |
|---|---|---|
| १. | नायगाव पोलीस ठाणे | गुन्हा रजि. क्र. I ५६/२०२५ भा.न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२),३(५) अन्वये (मुळ गुन्हा) |
| २. | नायगाव पोलीस ठाणे | गुन्हा रजि. क्र. I ८६/२०२५ भा.न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२) अन्वये |
| ३. | वाडा पोलीस ठाणे | गुन्हा रजि. क्र. I १९/२०२५भारतीय विदयुत अधि.(सुधारणा)२०२३ कलम १३६ अन्वये |
| ४. | मांडवी पोलीस ठाणे | गुन्हा रजि. क्र. I ३११/२०२४ भा.न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२) अन्वये |
| ५. | मांडवी पोलीस ठाणे | गुन्हा रजि. क्र. I २२/२०२५ भा.न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२) अन्वये |

सराईत गुन्हेगार १) अनिल अंबिका यादव व २) जयसिंग किशोरलाल चव्हाण यांचे विरोधात यापुर्वी दाखल असलेले चोरीचे गुन्हे खालीलप्रमाणे

| क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं व कलम |
|---|---|---|
| १. | मानपाडा पोलीस ठाणे | गु र नं ५६८/२०२३ भादविस ३७९, ३४ प्रमाणे |
| २. | कळंबोली पोलीस ठाणे | गु र नं १७५/२०२३ भादविस ३७९, ३४ प्रमाणे |
| ३. | कळंबोली पोलीस ठाणे | गु र नं १७६/२०२३ भादविस ३७९, ३४ प्रमाणे |
| ४. | पनवेल तालूका पोलीस ठाणे | गु र नं ९६/२०२३ भादविस ३७९, ३४ प्रमाणे |
| ५. | खांडेश्वर पोलीस ठाणे | गु र नं २२१/२०२३ भादविस ३७९, ३४ प्रमाणे |
| ६. | उरण पोलीस ठाणे | गु र नं ३०/२०२३ भादविस ३७९, ३४ प्रमाणे |
| ७. | उरण पोलीस ठाणे | गु र नं ३४/२०२३ भादविस ३७९, ३४ प्रमाणे |
| ८. | नाव्हाशीवा पोलीस ठाणे | गु र नं १५३/२०२३ भादविस ३७९, ३४ प्रमाणे |

सदरची कामगिरी मा. श्री मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो., मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो., मा. श्री अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक समीर अहिरराव, सपोनिरी/ सोपान पाटील, सपोनिरी/सागर शिंदे, पोउपनिरी/अजित गिते, सहाफौज/रमेश भोसले, पोहवा/ मुकेश पवार, रविंद्र पवार, प्रफुल्ल पाटील, चंदन मोरे, सचिन पाटील, जगदिश गोवारी, राजाराम काळे, दादा आडके, सुधीर नरळे, पोना/प्रशांतकुमार ठाकुर, पोशि/ अकिल सुतार, राहुल कर्पे, अनिल साबळे, अजित मैड, प्रतिक गोडगे, राजकुमार गायकवाड, मसुब/ रामेश्वर केकान, अविनाश चौधरी, सहाफौज/ संतोष चव्हाण, सायबर शाखा,मि.भा.व.वि. यांनी उत्कृष्टपणे पार पाडली आहे.


Goldmedal
गुन्हे शाखा
कक्ष-1, वसई
MIRA-BHAYANDAR-VASAI-VIRAR
POLICE COMMISSIONERATE
CRIME BRANCH
UNIT-2 VASAI
MH 02 BR 3377